मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# आमदार शंकर जगतापांचा राहुल साबळे कुटुंबाला आधार!

## कासारवाडी दुर्घटनेनंतर साबळे कुटुंबाला दिलासा; ५ लाखांचा धनादेश सुपूर्द

» पिंपरी | प्रतिनिधी

**स्वातंत्र्यदिनानिमित्त केलेली विद्युत रोषणाई उतरवताना कासारवाडी 'ह' क्षेत्रीय कार्यालयाच्या छतावरून पडून दुर्दैवी मृत्यू झालेल्या कामगार राहुल साबळे यांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपयांची आर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली आहे. शनिवारी (२९ ऑगस्ट) आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते या मदतीचा धनादेश मृत कामगाराच्या पत्नी आणि वडिलांकडे सोपवण्यात आला.**



काळेवाडीतील विजयनगर येथील रहिवासी असलेले राहुल साबळे (वय ४३) हे एका कंत्राटदार कंपनीत कार्यरत होते. १५ ऑगस्टनिमित्त कासारवाडी येथील 'ह' प्रभाग क्षेत्रीय कार्यालयाच्या दोन मजली पत्र्याच्या छतावर चढून विद्युत रोषणाई उतरवण्याचे काम सुरू असताना, त्यांचा पाय घसरून ते थेट खाली कोसळले. या दुर्घटनेत गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. या अचानक घडलेल्या दुर्दैवी घटनेमुळे साबळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला होता.

पोटाची खळगी भरण्यासाठी काम करताना प्राण गमावलेल्या कष्टाळू कामगाराच्या कुटुंबाला सावरण्यासाठी आणि दिलासा देण्यासाठी आमदार जगताप पुढे आले. त्यांनी संपूर्ण प्रकारची माहिती घेतली. या साबळे कुटुंबाला सावरण्यासाठी तात्काळ आर्थिक मदत देऊन आधार दिला . २९ ऑगस्ट रोजी पिंपळे गुरव येथील जनसंपर्क कार्यालयात आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते हा धनादेश कुटुंबाला देण्यात आला. यावेळी कै. राहुल यांच्या पत्नी संगीता राहुल साबळे, तसेच वडील विठ्ठल महादू साबळे यावेळी उपस्थित होते. त्यांच्याकडे धनादेश सुपुर्त करण्यात आला आहे

या वेळी ह प्रभाग अध्यक्षा तृप्ती कांबळे तसेच परिसरातील स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. जगताप यांनी यावेळी साबळे कुटुंबीयांचे सांत्वन करत या कठीण काळात त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची ग्वाही दिली.

> "राहुल साबळे यांचा झालेला अपघात अत्यंत दुर्दैवी आणि मनाला चटका लावणारा आहे. कुटुंबातील कर्ता पुरुष अचानक निघून गेल्याने साबळे कुटुंबावर मोठा आघात झाला आहे. जिवाचे मोल कोणत्याही मदतीने भरून निघू शकत नाही; परंतु या दुःखाच्या काळात त्यांच्या कुटुंबाला सावरण्यासाठी आणि थोडासा आर्थिक आधार मिळावा यासाठी ही मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला आहे. या कठीण प्रसंगात आम्ही साबळे कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत."
> **-शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा**

# बीएसएनएल डक्टमध्ये दोन मजुरांचा मृत्यू; ४४ तास उलटूनही गुन्हा दाखल नाही!

» पिंपरी | प्रतिनिधी

**निगडी प्राधिकरणातील बीएसएनएल डक्टमध्ये दोन मजुरांचा मृत्यू होऊन तब्बल ४४ तास उलटले, तरीही या प्रकरणात अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही. मृत्यूला नेमके कोण जबाबदार आहे, हे स्पष्ट नसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे जबाबदारी निश्चित होईपर्यंत गुन्हा दाखल करण्याची कारवाई रखडल्याचे चित्र आहे. शुक्रवारी रात्री नऊ वाजेपर्यंत या दुर्घटनेला जबाबदार कोण, हे स्पष्ट झाले नव्हते.**



या दुर्घटनेनंतर बीएसएनएल प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बीएसएनएलच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, कंपनीकडून घटनास्थळी कोणतेही कामगार पाठविण्यात आले नव्हते. संबंधित ठेकेदारांकडेही चौकशी केली असता त्यांनी कामगार पाठविले नसल्याचे सांगितले. त्यामुळे मृत मजूर नेमके कोणाच्या सांगण्यावरून डक्टमध्ये उतरले होते, त्यांना तेथे काम करण्यास कोणी पाठविले होते आणि हे काम कोणाच्या अखत्यारित सुरू होते, असे गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

या घटनेच्या वेळी मृत दोन मजुरांसोबत त्यांच्या नात्यातील आणखी तीन व्यक्ती उपस्थित होत्या. मात्र, दुर्घटनेनंतर हे तिघेही बेपत्ता असल्याचे समोर आले आहे. त्यांचे मोबाइल फोनदेखील बंद आहेत. त्यांच्या शोधासाठी पोलिसांचे एक पथक रवाना करण्यात आले आहे.

या तिघांचा शोध लागल्यानंतर दुर्घटनेच्या नेमक्या परिस्थितीवर अधिक प्रकाश पडण्याची शक्यता आहे. दुर्घटनास्थळी पोलिसांना दोन दुचाकी, खोदाईच्या कामासाठी वापरले जाणारे टिकाव, दोन मोबाइल फोन तसेच अन्य साहित्य आढळून आले आहे. त्यामुळे मृत मजूर डक्टमध्ये नेमके कोणते काम करण्यासाठी उतरले होते, याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

बीएसएनएल अधिकाऱ्यांनी कंपनीने कामगार पाठविले नसल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच ठेकेदारांकडूनही कामगार पाठविले नसल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे हे मजूर कोणत्या कामासाठी घटनास्थळी पोहोचले होते, त्यांना कामाची सूचना कोणी दिली होती आणि त्या कामाची परवानगी होती का, याचा तपास महत्त्वाचा ठरणार आहे. जबाबदारी निश्चित झाल्यानंतरच पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### ४४ तासांनंतरही जबाबदार कोण?

निगडी प्राधिकरणातील बीएसएनएल डक्टमध्ये दोन मजुरांचा मृत्यू होऊन ४४ तास उलटले, तरी या प्रकरणी अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही. मृत मजुरांसोबत असलेले आणखी तीन जण बेपत्ता असून त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे पथक रवाना करण्यात आले आहे. घटनास्थळी दोन दुचाकी, मोबाइल आणि खोदाईचे साहित्य आढळले आहे. मजूर डक्टमध्ये नेमके कोणाच्या सांगण्यावरून उतरले होते, त्यांना कामासाठी कोणी पाठवले होते आणि या दुर्घटनेला जबाबदार कोण, याचा तपास सुरू आहे. बीएसएनएलने कामगार पाठवले नसल्याचे सांगितल्याने प्रकरण अधिकच गुंतागुंतीचे झाले आहे.

> “मृत मजुरांबरोबर आणखी तिघेजण होते. त्यांच्या शोधासाठी एक पथक रवाना केले आहे. मजूर डक्टमध्ये का उतरले होते, त्यांना कुणी कामासाठी पाठविले होते का, हे स्पष्ट झाल्याशिवाय जबाबदारी निश्चित करता येणार नाही. बीएसएनएल अधिकाऱ्यांकडे चौकशी केली असता कामगार आम्ही पाठविले नसल्याचे सांगण्यात आले आहे. अधिक तपास सुरू आहे.”
> **-प्रशांत ढोले, सहायक पोलिस आयुक्त, पिंपरी विभाग**

# खाकीतील रक्षणकर्त्यांना चिमुकल्यांचा कृतज्ञतेचा धागा!

## गुरुवर्य अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी पोलीस ठाण्यात साजरा केला रक्षाबंधन सण

**»» पिंपरी | प्रतिनिधी**

**ऊन, पाऊस असो वा सण-उत्सव, समाजाच्या रक्षणासाठी स्वतःच्या कुटुंबापासून दूर राहून कर्तव्य बजावणाऱ्या खाकी वर्दीतील खऱ्या रक्षणकर्त्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करत गुरुवर्य अकॅडमी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यंदाचा रक्षाबंधन अत्यंत आगळ्यावेगळ्या आणि भावनिक पद्धतीने साजरा केला. चिखली पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्वतः तयार केलेल्या राख्या बांधून चिमुकल्यांनी सामाजिक बांधिलकीचा नवा आदर्श उभा केला.**

नेहमी केवळ भावंडांपुरता मर्यादित मानला जाणारा हा सण गुरुवर्य अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी समाजाचे अहोरात्र रक्षण करणाऱ्या पोलिसांना समर्पित केला. विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रेमाने आणि कल्पकतेने स्वतःच्या हातांनी राख्या तयार केल्या होत्या. चिखली पोलीस स्टेशनमध्ये जाऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजीत सर, पीएसआय दीपमाला लोहकरे मॅडम यांच्यासह उपस्थित पोलीस बांधवांच्या मनगटावर जेव्हा या चिमुकल्या हातांनी राखी बांधली, तेव्हा कर्तव्यकठोर पोलिसांच्या डोळ्यांतही कौतुकाचे आणि आपुलकीचे भाव दाटून आले.

या उपक्रमाप्रसंगी पोलीस हवालदार स्वप्नील पाचपांडे, पोलीस कॉन्स्टेबल स्वप्नील हांडे, राम निचाड, शिंदे मॅडम, हिरा तळपे मॅडम, हेड कॉन्स्टेबल संतोष मुंडे व देशमुख मॅडम यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांच्या या अनोख्या उपक्रमाने भारावून गेलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी मुलांचे कौतुक करत त्यांना सुरक्षितता, शिस्त आणि वाहतुकीच्या नियमांचे महत्त्व पटवून दिले. देशमुख मॅडम यांनी दैनंदिन जीवनातील उदाहरणे देत मुलांमध्ये शिस्त, जबाबदारीची जाणीव, संयम आणि संघभावना कशी रुजवावी, यावर मार्गदर्शन केले.

शाळेचे संस्थापक श्री. भूषण मावळे सर, मुख्याध्यापिका सौ. ज्योत्स्ना मॅडम, समन्वयक सौ. प्रतिभा मॅडम आणि सौ. मोहना मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली या संवेदनशील उपक्रमाचे नियोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सहज आणि प्रभावी सूत्रसंचालन सौ. वैशाली अरगडे मॅडम यांनी केले.

केवळ सण साजरा न करता समाजासाठी झटणाऱ्या घटकांप्रती आदर आणि संवेदनशीलता लहान वयातच विद्यार्थ्यांच्या मनात रुजावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश यशस्वी ठरला. खाकी वर्दी आणि चिमुकल्यांच्या नात्यातील हा रेशमी धागा उपस्थितांच्या मनात कायमचा घर करून गेला.





### चिखली पोलिसांना विद्यार्थ्यांच्या राख्या!

गुरुवर्य अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी रक्षाबंधनाचा सण केवळ भावंडांपुरता मर्यादित न ठेवता समाजाचे रक्षण करणाऱ्या पोलिसांना समर्पित केला. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या राख्या चिखली पोलीस स्टेशनमध्ये जाऊन पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मनगटावर बांधल्या. चिमुकल्यांच्या या प्रेमळ उपक्रमाने पोलिसही भारावून गेले. यावेळी पोलिसांनी विद्यार्थ्यांना सुरक्षितता, शिस्त, जबाबदारी आणि वाहतुकीच्या नियमांचे महत्त्व पटवून दिले. खाकी वर्दी आणि चिमुकल्यांमधील या रेशमी नात्याने उपस्थितांची मने जिंकली.



## कृष्णानगर स्पाईन रोडवर अवजड वाहनांचा बेकायदा 'कब्जा'; महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर!

**»» पिंपरी | प्रतिनिधी**

**कृष्णानगर येथील स्पाईन रस्तालगत असलेल्या सेवा रस्त्यावर दिवसेंदिवस अनधिकृतपणे उभ्या राहणाऱ्या अवजड वाहनांमुळे स्थानिक रहिवासी आणि वाहनचालक त्रस्त झाले आहेत. मुख्य रस्त्याला जोडणाऱ्या या सर्विस रस्त्यावर ट्रक, कंटेनर, ट्रॅव्हल्स यांसारखी अवजड वाहने दोन्ही बाजूंना तासनतास नव्हे तर कित्येक दिवस बेकायदेशीरपणे उभी करून ठेवली जातात.**

> "संबंधित सेवा रस्त्यावरील अनधिकृत अवजड वाहनांवर आमची कारवाई सुरू आहे. या भागात लवकरच अधिकृतपणे 'नो पार्किंग'चे फलक लावण्यात येणार आहेत. यानंतरही जर नियमांचे उल्लंघन करून कोणी वाहने पार्क केली, तर त्यांच्यावर आणखी कठोर दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येईल."
> -रामचंद्र घाडगे, वाहतूक पोलीस विभाग, तळवडे

> "नागरिकांची सुरक्षितता आणि सुविधा ही आमची प्राथमिकता आहे. सर्विस रस्त्यावर उभ्या राहणाऱ्या वाहनांमुळे परिसरातील महिलांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. ही समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी प्रशासनाशी चर्चा करून योग्य त्या उपाययोजना राबवल्या जातील आणि नागरिकांना सुरक्षित वातावरण मिळवून दिले जाईल."
> -रिटा सानप, नगरसेवक

> "कृष्णा नगर स्पाईन रोड सर्विस रस्त्यावरील अवजड वाहनांची बेकायदेशीर पार्किंग ही गंभीर समस्या बनली आहे. स्थानिक रहिवाशांना आणि विशेषतः महिलांना रात्रीच्या वेळी या मार्गावरून जाणे असुरक्षित झाले आहे. या मार्गावरील सर्व बेकायदा वाहनांवर तात्काळ दंडात्मक कारवाई करून रस्ता पूर्णपणे मोकळा करण्यासाठी आम्ही वाहतूक पोलिसांकडे पाठपुरावा करत आहोत."
> -निलेशदादा नेवाळे, नगरसेवक

## मोरवाडी असिफची भरारी; थेट सौदी अरेबियात 'ज्युनियर डिझायनर' म्हणून निवड!

**»» पिंपरी | प्रतिनिधी**

**प्रशिक्षणार्थी आयटीआय मध्ये प्रथम व द्वितीय अंतिम परीक्षेत प्रथम आला होता या निकषावर त्याला इनप्रो कंपनीमध्ये शिकाऊ उमेदवारी प्राप्त झाली. नंतर याच कंपनीमध्ये ट्रेनि म्हणून निवड झाली. उत्कृष्ट कामकाज, तांत्रिक कौशल्य व प्रामाणिकता याचे मूल्यमापन करून इनप्रो कंपनीने सौदी अरेबिया येथील मुख्य कंपनीमध्ये असिफ ची ज्युनियर डिझायनर म्हणून निवड केली आहे व याबाबतचा सर्व आवश्यक खर्च कंपनी करणार आहे.**



पालकांचे छत्र हरपलेले असतानाही प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मेहनत, तांत्रिक कौशल्य आणि प्रामाणिकतेच्या जोरावर मोरवाडी येथील पिंपरी-चिंचवड महानगरपालिका ITIचा प्रशिक्षणार्थी असिफ अल्लाउद्दीन मुलानी याने उल्लेखनीय यश मिळवले आहे. असिफची सौदी अरेबियातील दमाम येथे 'ज्युनियर डिझायनर' म्हणून निवड झाली असून, आवश्यक खर्च कंपनीकडून करण्यात येणार आहे.

असिफ हा २०२१-२३ सत्रातील ड्राफ्ट्समन मेकॅनिकल ट्रेडचा विद्यार्थी होता. प्रथम व द्वितीय वर्षाच्या अंतिम परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवल्याने त्याला इनप्रो कंपनीत शिकाऊ उमेदवारीची संधी मिळाली. उत्कृष्ट कामगिरी, तांत्रिक कौशल्य आणि प्रामाणिकतेच्या जोरावर त्याची पुढे कंपनीत प्रशिक्षणार्थी म्हणून निवड झाली. कामगिरीचे मूल्यमापन केल्यानंतर कंपनीने त्याची सौदी अरेबियातील मुख्य कंपनीत ज्युनियर डिझायनर म्हणून निवड केली.

हलाखीच्या परिस्थितीत मिळवलेले हे यश विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. असिफच्या यशाने प्रेरित होऊन त्याच्या बहिणीनेही मोरवाडी ITIमध्ये याच ट्रेडला प्रवेश घेतला आहे.

दरम्यान, विद्यार्थ्यांना परदेशातील शिक्षण व रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच 'परदेशी शिक्षण व रोजगार' हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात येणार आहे.

असिफच्या यशाबद्दल प्राचार्य शशिकांत पाटील, गटनिदेशक ओव्हाळ आर. एस., निदेशक काळोखे व्ही. व्ही. तसेच सर्व गटनिदेशक व निदेशकांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गाला ‘बूस्ट’!

## ४ किमी मार्गाच्या दुरुस्तीला युद्धपातळीवर वेग; १२ किमी रुंदीकरण दोन महिन्यांत!

**पुणे | प्रतिनिधी**

**तळेगाव-चाकण-शिक्रापूर या औद्योगिक आणि वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मार्गाची पावसाळ्यात झालेली दुरवस्था दूर करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने युद्धपातळीवर दुरुस्तीची कामे सुरू केली आहेत. वाहनचालकांना खड्डे आणि वाहतूक कोंडीचा सामना करावा लागू नये, यासाठी तुलनेने कमी खराब झालेल्या सुमारे ४० किलोमीटर रस्त्याची दुरुस्ती पुढील दोन दिवसांत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तर अधिक खराब झालेल्या सुमारे १४ किलोमीटर भागातील खड्डे बुजविणे आणि अन्य दुरुस्तीची कामे पुढील चार दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.**



सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या निर्देशानुसार संबंधित अधिकाऱ्यांना रस्त्याच्या दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गाची एकूण लांबी ५४ किलोमीटर असून, या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात अवजड वाहतूक तसेच प्रवासी वाहनांची ये-जा असते. त्यामुळे रस्त्यावरील खड्डे, खराब झालेले डांबरीकरण आणि त्यातून निर्माण होणारी वाहतूक कोंडी यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन दुरुस्तीच्या कामाला आता वेग देण्यात आला आहे.

मार्गावरील तुलनेने कमी खराब झालेल्या सुमारे ४० किलोमीटर रस्त्याची दुरुस्ती पुढील दोन दिवसांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तर एमआयडीसी पट्ट्यासह सुमारे १४ किलोमीटर रस्ता अधिक खराब झाल्याने या भागातील खड्डे बुजविणे, डांबरीकरण आणि आवश्यक अन्य दुरुस्तीची कामे पुढील चार दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. औद्योगिक वाहतुकीचे प्रमाण मोठे असल्याने या कामांदरम्यान वाहतुकीवर परिणाम होऊ नये, यासाठी आवश्यक नियोजन करण्याच्या सूचनाही संबंधित यंत्रणेला देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, या मार्गावरील वाढती वाहतूक लक्षात घेऊन सुमारे १२ किलोमीटर रस्त्याचे रुंदीकरण करण्यात येणार आहे. हे काम पुढील दोन महिन्यांत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. रस्त्याचे रुंदीकरण झाल्यानंतर या मार्गाची वाहतूक क्षमता वाढण्यास मदत होणार असून, विशेषतः चाकण एमआयडीसी परिसरातील वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता वाहतूक कोंडी कमी होण्याची अपेक्षा आहे.

गेल्या वर्षीचा अनुभव आणि रस्त्याची तातडीची दुरुस्ती आवश्यक असल्याचे लक्षात घेऊन या मार्गावरील दुरुस्तीचे काम एका वर्षासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाऐवजी राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठी तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी विशेष लक्ष देऊन ५४ किलोमीटर रस्त्याच्या दुरुस्तीबरोबरच काही भागातील रुंदीकरणासाठी ५९ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता.

त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने जानेवारी २०२६ मध्ये कार्यारंभ आदेश देऊन काही भागात काम सुरू केले होते. मात्र, रस्त्यालगत असलेल्या विविध सेवा वाहिन्यांमुळे निर्माण झालेले अडथळे तसेच डांबर उपलब्ध होण्यात आलेल्या अडचणींमुळे कामाला अपेक्षित गती देता आली नाही. त्यातच पावसाळ्यात रस्त्याची अवस्था आणखी खराब झाल्याने वाहनचालकांच्या अडचणी वाढल्या. त्यामुळे आता रस्त्याच्या तातडीच्या दुरुस्तीच्या कामाला युद्धपातळीवर वेग देण्यात आला आहे.

या कामाचा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडून वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे. रस्त्याची दुरुस्ती निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत. तात्पुरत्या दुरुस्तीबरोबरच या मार्गाची कायमस्वरूपी दर्जोन्नती करण्याची तयारीही सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत मार्गाच्या दर्जोन्नतीचे काम हाती घेण्यात येणार असून, पुढील तीन महिन्यांत या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे.

### तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्ग होणार कोंडीमुक्त

या दर्जोन्नतीमुळे मार्गाची वाहतूक क्षमता वाढण्याबरोबरच भविष्यात रस्त्याची वारंवार होणारी दुरवस्था आणि त्यातून निर्माण होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गावरील वाहनचालक आणि नागरिकांना तातडीच्या दुरुस्तीनंतर कायमस्वरूपी दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. आता प्रशासनाने निश्चित केलेल्या कालमर्यादेत ही कामे प्रत्यक्षात कितपत पूर्ण होतात, याकडे नागरिकांचे आणि वाहनचालकांचे लक्ष लागले आहे.

# अतिवृष्टीने पुणे जिल्ह्यात रस्ते-पुलांची दाणादाण; ६८ कोटींच्या निधीची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

**जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पुराचा ग्रामीण भागातील रस्ते, पूल आणि मोऱ्यांना मोठा फटका बसला आहे. जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अखत्यारितील तब्बल १६६.११ किलोमीटर रस्ते आणि १०७ पूल-मोऱ्या बाधित झाल्या आहेत. भोर, मुळशी, वेल्हे, मावळ, खेड, आंबेगाव आणि जुन्नर या सात तालुक्यांमध्ये अतिवृष्टीमुळे रस्त्यांची धूप झाली, अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले, तर काही भागांत पावसाचे पाणी रस्त्यावरून वाहून गेल्याने रस्त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.**



नुकसानग्रस्त रस्ते, पूल आणि मोऱ्यांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद बांधकाम विभागाने शासनाकडे ६८ कोटी २६ लाख रुपयांच्या निधीची मागणी केली आहे. यामध्ये रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी ४९ कोटी १६ लाख रुपये, तर पूल आणि मोऱ्यांच्या दुरुस्तीसाठी १९ कोटी १० लाख रुपये आवश्यक असल्याचे बांधकाम सभापती दीपाली हुलवळे यांनी सांगितले.

भोर, मुळशी, वेल्हे, मावळ, खेड, आंबेगाव आणि जुन्नर हे डोंगराळ तसेच घाटमाथ्याचा भाग असलेले तालुके असल्याने यंदाच्या मुसळधार पावसाचा येथील पायाभूत सुविधांवर मोठा परिणाम झाला आहे. अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी रस्त्यांची माती वाहून गेली असून, डांबरी रस्त्यांची धूप झाली आहे. काही भागांत रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतुकीवर परिणाम झाला आहे. त्याचबरोबर पूल आणि मोऱ्यांच्या संरचनेलाही धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी नुकसानग्रस्त रस्ते आणि पूल-मोऱ्यांची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक झाले आहे.

संबंधित सात तालुक्यांमध्ये जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील रस्त्यांची एकूण लांबी ४ हजार ८७०.३१ किलोमीटर आहे. त्यापैकी अतिवृष्टीमुळे १६६.११ किलोमीटर रस्त्यांचे नुकसान झाले आहे. या नुकसानग्रस्त रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी बांधकाम विभागाने ४९ कोटी १६ लाख रुपयांची मागणी केली आहे. तर १०७ बाधित पूल आणि मोऱ्यांच्या दुरुस्तीसाठी १९ कोटी १० लाख रुपयांची आवश्यकता असल्याचे विभागाने शासनाला कळविले आहे.

तालुकानिहाय पाहता मुळशी तालुक्यात सर्वाधिक ६५.८० किलोमीटर रस्त्यांचे नुकसान झाले आहे. याशिवाय २२ पूल आणि मोऱ्यांनाही अतिवृष्टीचा फटका बसला आहे. या सर्व दुरुस्तीच्या कामांसाठी मुळशीसाठी १७ कोटी ६५ लाख रुपयांची मागणी करण्यात आली आहे. त्यापाठोपाठ खेड तालुक्यात ३३.८३ किलोमीटर रस्ते बाधित झाले असून, तब्बल ३० पूल आणि मोऱ्यांचे नुकसान झाले आहे. सातही तालुक्यांच्या तुलनेत खेडमध्ये सर्वाधिक पूल-मोऱ्या बाधित झाल्या आहेत. या कामांसाठी २३ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे.

### आंबेगाव-जुन्नरला अतिवृष्टीचा तडाखा!

आंबेगाव तालुक्यात अतिवृष्टीमुळे १२.७० किलोमीटर रस्ते आणि आठ पूल-मोऱ्यांचे नुकसान झाले आहे. या दुरुस्तीच्या कामांसाठी ४ कोटी ८१ लाख रुपये आवश्यक असल्याचे बांधकाम विभागाने स्पष्ट केले आहे. तर जुन्नर तालुक्यात १५.४० किलोमीटर रस्ते आणि २२ पूल-मोऱ्या बाधित झाल्या असून, या कामांसाठी ६ कोटी ३० लाख रुपयांच्या निधीची मागणी करण्यात आली आहे.

# शिक्षक भरतीचा दुसरा टप्पा ऑक्टोबरमध्ये?

## मुलाखतीसह निवडीत १०,३२८ पदे; पहिल्या टप्प्यातील रिक्त जागांसाठी 'कन्व्हर्टेड राउंड'

**पुणे | प्रतिनिधी**

**राज्यातील शिक्षक भरती प्रक्रियेला आता वेग येण्याची शक्यता असून, मुलाखतीशिवाय निवड प्रकारातील उमेदवारांच्या शिफारशीनंतर मुलाखतीसह निवड प्रकारातील १० हजार ३२८ पदांसाठी उमेदवारांची शिफारस लवकरच करण्यात येणार आहे. ही प्रक्रिया सप्टेंबरअखेरपर्यंत पूर्ण करण्याचे शिक्षण विभागाचे नियोजन आहे. त्यानंतर शिक्षक भरतीच्या दुसऱ्या टप्प्याची पूर्वतयारी सुरू होणार असून, ऑक्टोबरमध्ये किमान पाच हजार पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे.**



राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षक भरती पवित्र संकेतस्थळाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. या भरतीमध्ये मुलाखतीशिवाय निवड आणि मुलाखतीसह निवड अशा दोन प्रकारांत पदे भरण्यात येत आहेत.

मुलाखतीशिवाय निवड प्रकारासाठी उपलब्ध झालेल्या १९ हजार ७५४ पदांसाठी १३ हजार ११९ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हा परिषद, नगरपालिका, नगर परिषद, महानगरपालिका, आदिवासी विकास विभागाच्या शासकीय शाळा, शासकीय विद्यानिकेतन तसेच खासगी शैक्षणिक संस्थांमधील पदांचा समावेश आहे.

या प्रक्रियेत समांतर आरक्षणातील माजी सैनिक प्रवर्गाच्या २ हजार ७६० जागा, तर अंशकालीन आरक्षणातील १ हजार ७६० जागा संबंधित प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्याने रिक्त राहिल्या आहेत. या रिक्त जागा भरण्यासाठी 'कन्व्हर्टेड राउंड' राबविण्याचे शिक्षण विभागाचे नियोजन असून, त्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे.

दरम्यान, मुलाखतीसह निवड प्रकारातील १० हजार ३२८ पदांची भरती प्रक्रिया आता पुढे जाणार आहे. शासन निर्णयानुसार या प्रक्रियेसाठी ४५ दिवसांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. यामध्ये पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावणे, एका उमेदवाराला तीन ठिकाणी मुलाखत देण्याची संधी देणे, निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे आणि नियुक्ती मिळूनही रुजू न झाल्यास प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना संधी देणे, अशा टप्प्यांतून प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे.

सप्टेंबरअखेरपर्यंत मुलाखतीसह शिक्षक भरती पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याची माहिती शिक्षण उपसंचालक राजेश शिंदे यांनी दिली आहे. त्यामुळे या प्रक्रियेत सहभागी झालेल्या उमेदवारांना आता नियुक्तीच्या पुढील हालचालींची प्रतीक्षा आहे.

पहिल्या टप्प्यात खासगी अनुदानित शाळांमधील काही संस्थांची बिंदूनामावली पूर्ण होऊ शकली नसल्याने त्या शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे दुसऱ्या टप्प्यात भरण्यात येणार आहेत. याशिवाय कनिष्ठ महाविद्यालये, काही जिल्ह्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आणि खासगी अनुदानित शाळांमधील पदांचाही या टप्प्यात समावेश होण्याची शक्यता आहे.

शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांच्या माहितीनुसार, दुसऱ्या टप्प्यात सुमारे पाच हजार पदे उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे पहिल्या टप्प्यानंतर शिक्षक भरतीची प्रतीक्षा करणाऱ्या उमेदवारांसाठी दुसरा टप्पा महत्त्वाचा ठरणार आहे.

एकीकडे १० हजार ३२८ पदांची मुलाखतीसह निवड प्रक्रिया पूर्ण करण्याची लगबग सुरू असताना, दुसरीकडे रिक्त राहिलेल्या पदांसाठी कन्व्हर्टेड राउंड आणि त्यानंतर नव्या पदांसाठी दुसरा टप्पा राबविण्याचे नियोजन आहे. त्यामुळे शिक्षक भरतीची प्रतीक्षा करणाऱ्या हजारो उमेदवारांचे लक्ष आता सप्टेंबरअखेरच्या प्रक्रियेकडे आणि ऑक्टोबरमध्ये सुरू होणाऱ्या दुसऱ्या टप्प्याकडे लागले आहे.

### ऑक्टोबरमध्ये दुसरा टप्पा?

पहिल्या टप्प्यातील भरती प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सप्टेंबरअखेरपासून दुसऱ्या टप्प्यातील शिक्षक भरतीची पूर्वतयारी सुरू होणार आहे. शिक्षक भरतीचा दुसरा टप्पा ऑक्टोबरमध्ये सुरू होण्याची शक्यता आहे.

# आयटीयन्ससाठी खुशखबर! हिंजवडी मेट्रोतून थेट कंपन्यांत प्रवेश

**पुणे | प्रतिनिधी**

**हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोमुळे हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कमध्ये काम करणाऱ्या हजारो आयटी कर्मचाऱ्यांचा प्रवास अधिक सोयीचा होणार आहे. मेट्रो स्थानकातून थेट कार्यालयात जाता यावे, यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) पुढाकार घेतला असून, मेट्रो स्थानकांना थेट आयटी कंपन्यांशी जोडणारे विशेष पादचारी उड्डाणपूल उभारण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. सध्या पाच कंपन्यांनी या सुविधेसाठी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.**




हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोचे उद्घाटन सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. मेट्रो सुरू झाल्यानंतर हिंजवडी आयटी पार्ककडे ये-जा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. मात्र, मेट्रो स्थानकावरून कंपनीपर्यंत पोहोचण्यासाठी रस्ता ओलांडणे, वाहतूक कोंडीचा सामना करणे आणि पुन्हा वाहनांचा वापर करणे टाळता यावे, यासाठी एमआयडीसीने थेट कंपन्यांशी जोडणाऱ्या पादचारी उड्डाणपुलांची संकल्पना मांडली आहे.

या प्रस्तावानुसार मेट्रो स्थानकातून बाहेर रस्त्यावर न उतरता कर्मचाऱ्यांना थेट संबंधित कंपनीच्या आवारात प्रवेश करता येणार आहे. त्याचप्रमाणे कार्यालयातून बाहेर पडताना थेट पादचारी उड्डाणपुलावरून मेट्रो स्थानकात जाता येईल. त्यामुळे आयटी कर्मचाऱ्यांचा वेळ वाचण्याबरोबरच रस्त्यावरील वाहतूकही कमी होण्यास मदत होणार आहे.

एमआयडीसीच्या प्रस्तावाला इन्फोसिस आणि एम्बसी क्वाड्रन बिझनेस पार्कने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. इन्फोसिसकडून मेट्रो स्थानक क्रमांक चार आणि पाचला जोडणारे पादचारी उड्डाणपूल उभारण्यात येणार आहेत. तर एम्बसी क्वाड्रन बिझनेस पार्ककडून मेट्रो स्थानक क्रमांक दोनला जोडणारा पादचारी उड्डाणपूल उभारण्याची तयारी आहे.

याशिवाय टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS), टेक महिंद्रा आणि बिर्लासॉफ्ट या कंपन्यांनाही एमआयडीसीकडून अशा प्रकारचा प्रस्ताव देण्यात आला आहे. आयटी पार्कमधील इतर मोठ्या कंपन्यांनीही पुढाकार घेतल्यास मेट्रो आणि कार्यालय यांच्यात थेट कनेक्टिव्हिटी निर्माण होणार आहे.

या पादचारी उड्डाणपुलांसाठी आवश्यक जागा एमआयडीसीकडून उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यामुळे कंपन्यांना आपल्या कर्मचाऱ्यांसाठी थेट मेट्रो कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे. हिंजवडी आयटी पार्कमधील सुमारे एक लाख कर्मचाऱ्यांना या सुविधेचा फायदा होण्याची शक्यता आहे.

एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता राजेंद्र तोतला यांनी दिलेल्या माहितीनुसार, कर्मचाऱ्यांना मेट्रो स्थानकातून थेट कंपनीत आणि कंपनीतून थेट मेट्रो स्थानकात जाता यावे, हा या प्रस्तावामागील मुख्य उद्देश आहे. यामुळे कर्मचाऱ्यांची मोठी सोय होणार असून, रस्त्यावरील वाहनांची गर्दी कमी करण्यासही मदत होणार आहे.

सध्या हिंजवडी परिसरातील वाहतूक कोंडी हा आयटी कर्मचाऱ्यांसह पुणेकरांसाठी मोठा प्रश्न आहे. मेट्रो सेवा सुरू झाल्यानंतर अनेक कर्मचारी खासगी वाहनांऐवजी मेट्रोचा वापर करतील, अशी अपेक्षा आहे. त्यातच मेट्रो स्थानक ते कंपनी थेट जोडणारे पादचारी उड्डाणपूल उभारले गेल्यास 'घरातून मेट्रो–मेट्रोतून थेट ऑफिस' असा प्रवास शक्य होणार आहे. त्यामुळे हिंजवडीतील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीनेही हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.